udyan.doc-

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/७५६५
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि१०/११/२०१६

-: जाहिरात :-

## WALK - IN- INTERVIEW

दि.२१/11/२०१६, वेळ सकाळी 11 वाजतां

स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकरिता उद्यान प्रमुख (उद्यान अधिक्षक) व तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून Walk - in-Interview व्दारे करार पध्दतीने खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | उद्यान प्रमुख | १ (एक) | (अ) मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस.सी., एम.एस.सी. (हार्टिकल्चर्स) ॲग्रीक्लचर/ बॉटनी / फॉरेस्ट्री पदवी /मान्यता प्राप्त विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परिक्षा उत्तीर्ण, एम.टेक उमेदवारांस प्राधान्य. शासनाकडील निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थाकडील कामाचा किमान ७ वर्षाचा अनुभव<br>(ब) शासनाकडील निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थाकडील कृषी/उद्यान अधिकारी (वर्ग - १) या पदावरील किमान ०७ वर्षाचा अनुभव धारण करणा-या उमेदवारांस प्राधान्य. | एकवट मानधन रुपये २०,०००/- यावर सहा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |

**शर्ती व अटी :-**

१) वयोमर्यादा :- दि.०१/११/२०१६ रोजी ३३ वर्षापेक्षा जास्त असू नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये.उच्च व जादा शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांसाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राहील.

२) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

३) संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन त्यांचे विरुध्द कोणतेही गुन्हे नोंदविण्यात आलेले नाही अथवा गुन्हा सिध्द झालेला नाही असे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या दोन सांक्षाकिंत प्रती, दोन पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस उपस्थित रहावे.

५) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

६) स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.

७) कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहातील.

८) नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाब/गैरमार्गांचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

९) सदरची नियुक्ती ही केवळ ठरावविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर करार पध्दतीने असल्याने नियुक्ती पूर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार पत्र करुन दयावे लागेल. या बाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१०) सदरचे जाहिरात सो.म.पा.च्या या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावरही प्रसिध्द करणेत आलेली आहे.

9-11-16

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

सोलापूर महानगरपालिका

उद्यान अधिक्षक या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करिता
खालीलप्रमाणे शर्ती व अटी राहतील.

१) सदरची नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर राहील. सदरचे करार पत्र रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून दयावे लागेल.

२) सदर पदावरील नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधीकरिता असून पूर्णवेळ काम करणेच्या अटीवर राहील. नियुक्तीस सहा महिन्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही.

३) याकामी करारपध्दतीने दरमहा रुपये २००००/- इतके एकवट मानधन दिले जाईल.

४) आपली नियुक्तीही सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील सर्व उद्यान(बागा), प्राणीसंग्रहालय, आयलॅन्डस, कारंजे, नौका विहार, स्टेडियम इत्यादीवरील त्याअनुषंगीक कामे व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणेची आहे. तसेच याशिवाय वरिष्ठ अधिका-याकडून वेळोवेळी सांगतील ती कामे व कर्तव्ये पार पाडावी लागतील.

५) सदरचे पदावर करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असल्याने, भविष्यात म.न.पा.कडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही. व नोकरीत कायम करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

६) नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा,पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. आपली नियुक्तीही करार तत्वावर व फक्त एकत्रित मानधनावर आहे.

७) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

८) आपण जर अन्य ठिकाणी नोकरीस असेल तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा मला हजर करणे बंधनकारक आहे.

९) सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणुकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१०) आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पूर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा तीस दिवसाचे एकवट वेतन (पगाराची) रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक आहे.

११) नियुक्ती कालावधीमध्ये कोणतीही रजा अनुज्ञेय नसल्याने, दोन महिन्यातून एक अनुपस्थिती वेतनासाठी ग्राहय धरणेत येईल.

9/11/16

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.